मनोगत

We are all going through a toughest phase in our entire life. Corona has become never ending story now. The nature God is testing our patience. We all should come out with flying colors in this test. I know Bhanaps are law abiding. All must be following Covid protocols. But there are many people who are careless about their own health as well as others' health. So our responsibility increases. We need to be more careful. With all restrictions, we are honestly discharging all our duties, obligations. Our God and our Guru are with us in this crusade against this common enemy of the humanity. 63 years ago on 1st March Anadashram Swamiji bestowed upon our community the gem named Ravindra Shukla and named him Swami Parijnanashram III. We are the blessed lot to have witnessed this historic event on Shivaji Park. That sight can never be forgotten. Every time we hope that we all will be able to meet at our next program, but every time we get disappointed because every program may it be Swamiji's Shishya sweekar day or Swamiji's birthday or Thread ceremony or a marriage in the family we only meet on zoom. Now ZOOM has become part of our life.

Once Arjuna asked Krishna-'Madhav.. What is this 'successful life'?

Krishna took Arjuna to fly kites. Arjuna was watching Krishna carefully flying a kite.

After a while Arjuna said-Madhav.. Because of this thread, the kite is not able to move freely and upwards, should we break it? It will go higher. Krishna broke the thread.. The kite went up a little more and then came down after waving and fell at a distant unknown place...

Then Krishna explained the philosophy of life to Arjuna. 'Parth, the height we are at in life… We often feel that certain things to which we are tied are preventing us from going higher; like :House, family, discipline, mother-father-master and Society. And we want to be free from them...In fact, these are the threads - which keep us at that height. 'Without these threads we will go up once, but later we will have the same fate that happened to a kite without thread...'

"So, if you want to remain on the top in life, then never break your relationship with these threads. "The height attained by successful balance of thread and kite-like attachment is called 'successful life.."

Listening or reading about any of our Swamijis is also as auspicious as Swamiji's Pravachan/Ashirvachan. We have decided to start giving brief life history of all Swamijis of our Guru Parampara one by one under Ashirvachan from this issue. Jai Parijnan !

आशीर्वचन

प्रथम गुरू श्री स्वामी परिज्ञानाश्रम।

चित्रापूर सारस्वतांचे मूळस्थान काश्मीर होय. आम्ही आश्वलायन सूत्राचे ऋग्वेदी स्मार्त ब्राह्मण. आपले लोक तिथून प्रथम दक्षिणे कडील पंजाब प्रांतात आले व त्यांनी सरस्वती नदीच्या काठी वास्तव्य केले. त्यांच्यापैकीच काही लोकांनी काही कारणांनी गोव्यात स्थलांतर केले. हेच आमचे मूलपुरुष. नंतर गोव्यातील पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी ब्राह्मणांना जबरदस्तीने ख्रिश्चन करण्यास प्रारंभ केल्यामुळे आपल्या धर्माच्या रक्षणाकरिता आमचे लोक गोवा प्रांताच्या बाहेर उत्तर कानडा व दक्षिण कानडा जिल्ह्यामध्ये जाऊन तेथेच वास्तव्य करून राहीले.

त्यावेळी कानडा जिल्ह्याचा अधिपती असलेल्या नगर संस्थानच्या दरबारात आमचे अनेक लोक मोठमोठ्या अधिकाराच्या जागेवर होते. त्यांच्या काही हितचिंतकांनी नगर संस्थानाच्या अधिपतीकडे चहाडी केली की हे लोक ब्राह्मण नव्हेत, यांना गुरू नाही. त्याने आमच्या लोकांना बोलावून विचारणा केली, ''तुम्हांला गुरू आहेत काय आणि ते कुठे असतात?'' यांनी उत्तर दिले, ''आमचे गुरू उत्तर हिंदुस्थानात आहेत.'' त्यावेळी गोकर्ण व बंकीकोड्लामधे आमच्या लोकांची पुष्कळ वस्ती होती. आमचे पुष्कळ प्रमुख लोक गोकर्णात रहात होते. नगरच्या लोकांनी गोकर्णच्या प्रमुखांना लिहून ही हकिकत कळविली आणि सल्ला मागितला. त्यांनाही काही उपाय सुचेना तेव्हां गोकर्ण व बंकीकोड्लामध्ये रहाणाऱ्या सर्व कर्त्या लोकांनी एकत्र बसून विचार-विनिमय केला व शेवटी सर्वानुमते असे ठरले की सर्वांनी गोकर्ण महाबळेश्वराकडे जाऊन त्या देवाचीच प्रार्थना करावयाची आणि ते सर्व त्या देवालयात गेले व विधिपूर्वक पूजाअर्चा करून एकाग्र मनाने देवाचे ध्यान करीत दिवसभर उपवास करून देवाकडे धरणे धरून बसले की ईश्वराने आम्हाला गुरूंचे दर्शन करवून दिल्याखेरीज घरी परत जावयाचे नाही व त्या दृढ निश्चयाने रात्रसुद्धा त्यांनी तिथेच घालवली. त्या सर्व भक्तांची दृढभक्ती व विश्वास पाहून महाबळेश्वराला पाझर फुटला व त्याने त्यातील प्रमुख व वृद्ध गृहस्थाला स्वप्नांत दर्शन देऊन ''तुम्ही काळजी करू नका, उद्या गोधूली मुहुर्तावर एक संन्यासी उत्तर हिंदुस्थानांतून कोटितीर्थावर येईल, तोच तुमचा गुरू होईल, त्याला तुम्ही शरण जा,'' असा दृष्टांत देऊन ईश्वर अदृश्य झाले. ते वृद्ध गृहस्थ स्वप्नातून जागे झाले व त्यांनी आपल्या जवळच ध्यानमग्न स्थितींत असलेल्या चिंतातुर लोकांना दृष्टांताबद्दल सविस्तर सांगितले. हे ऐकून सर्वांना आनंद झाला व सर्वजण आपापल्या घरी परत गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच ते सर्व लोक कोटितिर्थाकडे जमले व जेवणसुद्धा न करता तेथेच बसून राहिले. सायंकाळी सुमारे पाच वाजण्याचे सुमारास (गोधूली मुहुर्तावर) गंगावळी नदीच्या बाजूने एक संन्यासी कोटितिर्थाकडे हे लोक असलेल्या जागी आले. त्या संन्याशाना पाहिल्याबरोबर सगळे लोक त्यांना शरण गेले व ''तुम्ही आमचे गुरू होऊन आमचा उद्धार करा'' अशी त्यांनी त्या संन्याशाचे पाय धरून प्रार्थना केली. श्रीभवानीशंकर देवांनी स्वप्नांत प्रसन्न होऊन तुम्हाला दु:खातून मुक्त करण्याची मला आज्ञा केली आहे. तुमच्या इच्छेप्रमाणे होऊ द्या'' असे त्यांनी जमलेल्या लोकांना आश्वासन दिले. लगेच लोकांनी त्यांन भंडीकेरी येथील उमामहेश्वर मठात बोलावून नेले व त्यांना आपले गुरू म्हणून

घोषित केले. आमच्या गुरूपरंपरेतील हे पहिले गुरू. श्री परिज्ञानाश्रम असे त्यांचे नामाभिधान झाले. ही सर्व हकिकत इसवीसन १७०८ ‘सर्वधारी’ संवत्सराच्या माघ महिन्यात घडली. हे सर्व गोकर्णातील लोकांनी नगर संस्थानातील आमच्या लोकांना लिहून कळविली, त्यांनी ती संस्थानाधिपतीला कळविली. ‘‘त्या तुमच्या गुरूंना बोलावून त्यांची मला भेट करवा’’ असे अधिपतीने सांगितल्यावरून आमच्या लोकांनी गुरूंना प्रार्थना करून नगर संस्थानाला त्यांना बोलावून नेऊन त्यांची संस्थानाधिपतींशी भेट घडवून आणली.

तेव्हां त्या अधिपतीने आमच्या गुरूजींना ‘‘आपण सारस्वतांचे गुरू आहात या बाबतीत शृंगेरीच्या जगद्‌गुरूंचे प्रमाणपत्र आणा’’ असे सांगितले. आमचे गुरू ज्ञानी व निराभिमानी असल्यामुळे अधिपतीच्या म्हणण्याप्रमाणे शृंगेरीस जाण्यास त्यांनी संमती दिली. परंतु तेथे गेल्यावर ज्या रितीने त्यांचा मानसन्मान व्हावयास पाहिजे होता तसा झाला नाही. तो अपमान आमच्या स्वामीजींना सहन झाला नाही. म्हणून श्रीशंकराचार्यांनी काश्मीरहून आणून शृंगेरी मठात स्थापिलेल्या शारदांबा देवीची आराधना करण्यास आमच्या स्वामीजींनी प्रारंभ केला व आपल्या तपोबलाने त्या देवीचे तेज त्यांनी आपल्याकडे आकर्षित केले. तेव्हां सरस्वती देवीने श्रीशंकराचार्यांच्या स्वप्नात येऊन सांगितले, ‘‘माझा परम भक्त येथे आला असतां तुम्ही त्याचा आतिथ्यसत्कार केला नाहीत व उलट त्याचा अपमान केलात, म्हणून मी त्याच्याबरोबर जाते.’’ सकाळी उठल्याबरोबर जगद्‌गुरूंनी चौकशी केली असतां त्यांना समजले की सरस्वतांचे गुरू आले होते त्यांचा आदरसत्कार योग्य रितीने झाला नाही. त्यांनी मठाजवळच एका कुटीत वास्तव्य केले आहे. या गोष्टीला जबाबदार असलेल्यांना रागे भरले व त्यांना आदराने मठात घेऊन येण्याच्या सूचना दिल्या. आमच्या स्वामीजींनी आल्यावर जगद्‌गुरूनीं झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली व त्यांचा यथोचित आदरसत्कार केला व त्यांचे येण्याचे कारणही समजून घेतले. त्या भेटीत दिसून आलेली त्यांची विद्वत्ता, त्यांचे तपोबल, त्यांची योगसाधना वगैरे पाहून जगद्‌गुरू प्रभावित झाले व शारदांबेचे तेज आकर्षण करण्याइतपत खरोखरच त्यांची योग्यता आहे असे त्यांनी जाणले. शारदांबेची मूर्ती तशीच निस्तेज राहिली तर आपल्या पवित्र मठाची कीर्ति नाश पावेल म्हणून त्यांनी आमच्या स्वामीजींना विनंती केली की शारदांबेचे आकर्षण केलेल्या तेजाचे परत त्या देवीमध्ये आवाहन करावे. जगद्‌गुरूंच्या त्या विनंतीला मान देऊन आमच्या स्वामीजींनी त्याप्रमाणे केले.

शिवाय जगद्‌गुरूंनी आमच्या स्वामीजींचा योग्य सत्कार करून त्यांच्या संस्थानाला शोभेल अशी आडव्या पालखीसह बिरुदावलीही त्यांना दिली. याकारणास्तवच शृंगेरी मठामध्ये महानवमीच्या उत्सवामध्ये पहिला मानमरातब सारस्वतांनाच देण्याचा रिवाज अजूनसुद्धा चालू आहे.

नंतर आमचे गुरूमहाराज नगरसंस्थानाला परत आले व तिथल्या अधिपतींची भेट घेऊन जगद्‌गुरूंचे प्रमाणपत्र त्यांना दाखविले. ते पाहून नगर संस्थानाधिपतींना संतोष झाला व त्यांनी आमच्या स्वामीजींची योग्य मानमर्यादा करून त्यांना निरोप दिला नंतर स्वामीजी तेथून गोकर्णाला गेले व त्यांनी आपल्या मठात प्रवेश केला. परंतु नेहमी मठांतच राहणे स्वामीजींना पसंत नव्हते. आपण संन्यासी असल्यामुळे एकाच ठिकाणी दीर्घकाल राहण योग्य नव्हे, पवित्र स्थळी संचार करणेच योग्य आहे असे

मनाशी ठरवून त्यांनी आपला मनोदय भक्तांपाशी व्यक्त केला. पण शिष्यवर्गाने त्यांची पुष्कळ रितीने मनधरणी करून त्यांना मठातच ठेऊन घेतले आणि स्वामीजींना एक मठ बांधवून दिला. नंतर गुरूपरंपरा अखंड चालावी म्हणून आपण कोणास तरी शिष्य करावे अशी भक्तवर्गाने स्वामीजींजवळ प्रार्थना केली. तसेच स्वामीजींच्या सांगण्यावरून हरीटेकार कुटुंबातील कृष्णय्या शानभाग यांचा मुलगा 'मर्तु' शिष्यस्थानी घेण्यास योग्य आहे असे ठरले व कृष्णय्यांना आपला मुलगा शिष्यस्वीकाराकरिता द्यावा अशी विनंती करण्यात आली. पण कृष्णय्यांना तो एकच मुलगा असल्यामुळे त्यांनी ही विनंती नाकारली. गोकर्णातील तसेच नगर संस्थानातील लोकांनी मिळून कृष्णय्यांना कळविले की जर कृष्णय्या शानभाग आपल्या मुलास शिष्य म्हणून देतील तर मठाचा कारभार त्यांच्याकडे देऊ व पुढेसुद्धा त्यांच्याच कुटुंबातून शिष्याची निवड केली जाईल. त्यानंतर कृष्णय्यांची सम्मती मिळाली व त्याप्रमाणे महाजनांनी कृष्णय्यांना तशा अर्थाचा लेखी करारनामा लिहून दिला.

जर कृष्णय्यांच्या कुटुंबात शिष्यस्वीकारासाठी कोणी योग्य नसेल तर कृष्णय्यांनीच दुसऱ्या कोणत्या तरी घराण्यांतून निवडलेल्या मुलास शिष्य म्हणून स्वीकार करूं असेही त्या करारनाम्यात नमूद करण्यात आले. नंतर कृष्णय्यांच्या मुलास बोलावून आणून १७२० मध्ये शार्वरी संवत्सराच्या चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी गोकर्ण मठात त्यांचा शिष्यस्वीकार झाला व त्यांचे 'श्रीशंकराश्रम' असे नामाभिधान झाले. त्याचवेळी कृष्णय्या शानभागांना व त्याच्या संततीला 'शुक्लभट' अशी पदवी दिली इतकेच नव्हे तर कृष्णय्या शानभागांची मठाचे कारभारी (मणेगार) म्हणून नेमणूक झाली.

पहिल्या श्रीपरिज्ञानाश्रम स्वामीजींची कारकीर्द १७०८ पासून १७२० पर्यंत चालली. शार्वरी संवत्साराच्या चैत्र वैद्य चतुर्दशीस हे स्वामी समाधिस्थ झाले. त्याची समाधी गोकर्ण येथील भंडीकेरी मठात आहे.

❑❑❑

।। गुरुवरा अनाथ केले आम्हां ।।

गुरुवरा अनाथ केले आम्हां। प्रीतीच्या ह्या बालकांवरी निष्करुणा का तुम्हां।।धृ।।
सारस्वत जनतेचे दैवत। जगीं समस्त होते शोभत।।
अनन्य भावे सेवित पूजित। प्रार्थित होतो तुम्हां।।१ ।।
आमुची सदगुरु ध्येयमूर्ति ती। देवा निर्दयी तू अपहरिली।।
कोणा अपराधे तू बुडविले। दु:ख सागरी आम्हां।।२ ।।
सारस्वतांचे तेज कुंदले। गुरु महाराजा दैवी धरिले।।
देवा चरणी लोळत म्हणती। कोण गति आम्हां।।३ ।।
कृपादृष्टि फिरवा आम्हांवरी। आशिष द्यावा आम्हा निरंतरी।।
'सुधातनय' विनवी बहुविधपरि। दयाघना हो तुम्हां।।४।।

सुधातनय

IN QUEST OF GOD - 4

- Swami Ramdas

RENUNCIATION

NOW from the narrow pond of a worldly life Ram had lifted up his slave to throw him into the extensive ocean of a Universal Life. But to swim in the wide ocean, Ram knew, Ramdas wanted strength and courage, for gaining which Ram intended to make his ignorant and untrained slave to pass through a course of severe discipline, and this under His direct guidance and support. So, one night while engaged in drinking in the sweetness of His name, Ramdas was made to think in the following strain: "O Ram, when Thy slave finds Thee at once so powerful and so loving, and that he who trusts Thee can be sure of true peace and happiness, why should he not throw himself entirely on Thy mercy, which can only be possible by giving up everything he called 'mine'? Thou art all in all to Thy slave. Thou art the sole Protector in the world. Men are deluded when they declare, 'I do this, I do that. This is mine, that is mine'. All, O Ram, is Thine, and all things are done by Thee alone. Thy slave's one prayer to Thee is to take him under Thy complete guidance and remove his 'I'ness."

This prayer was heard. Ramdas' heart heaved a deep sigh; a hazy desire to renounce all and wander over the earth in the garb of a mendicant in quest of Ram wafted over his mind. Now Ram prompted him to open at random the book "Light of Asia" which was before him at the time. His eyes rested upon the pages wherein is described the great renunciation of Buddha, who says:- "For now the hour is come when I should quit this golden prison, where my heart lives caged, to find the Truth; which henceforth I will seek, for all men's sake, until the truth be found." Then Ramdas similarly opened the "New Testament" and lighted upon the following definite words of Jesus Christ:- "And everyone that hath forsaken houses or brethren or sisters or father or mother or wife or children or lands for my name's sake, shall receive a hundredfold and shall inherit everlasting life."

Then again he was actuated in the same way to refer to the "Bhagavad Gita" - and he read the following *Sloka*:- Sarvadharmaan Parityajya Maam Ekam Saranam Vraja, Aham Twaa Sarvapaapebhyo Mokshayishyaami Maa Suchah, "Abandoning all duties come to Me alone for shelter, sorrow not, I will liberate Thee from all sins."

Ram had thus spoken out through the words of these three great *Avatars* - Buddha, Christ and Krishna - and all of them pointed to the same path - renunciation. At once Ramdas made up his mind to give up for the sake of Ram, all that he till then hugged to his bosom as his own, and leave the *Samsaric* world. During this period, he was very simple in his dress which consisted of a piece of cloth covering the upper part of the body and another wound round the lower part. Next day, he got two clothes of this kind dyed in *Gerrua* or red ochre, and the same night wrote two letters - one to his wife whom Ram had made him look upon for sometime past as his sister and another to a kind friend whom Ram had brought in touch with Ramdas for his deliverance from debts. The resolution was made. At five o'clock in the morning he bade farewell to a world for which he had lost all attraction and in which he could find nothing to call his own. The body, the mind, the soul - all were laid at the feet of Ram - that Eternal Being, full of love and full of mercy.

❑❑❑

MAYA AND ILLUSION - 4

(Lecture delivered by “SWAMI VIVEKANANDA” in London)

Again, we often hear that it is one of the features of evolution that it eliminates evil, and this evil being continually eliminated from the world, at last only good will remain. That is very nice to hear, and it panders to the vanity of those who have enough of this world's goods, who have not a hard struggle to face every clay and are not being crushed under the wheel of this so-called evolution. It is very good and comforting indeed to such fortunate ones. The common herd may surfer, but they do not care; let them die, they are of no consequence. Very good, yet this argument is fallacious from beginning to end. It takes for granted, in the first place, that manifested good and evil in this world are two absolute realities. In the second place, it make, at still worse assumption that the amount of good is an increasing quantity and the amount of evil is a decreasing quantity. So, if evil is being eliminated in this way by what they call evolution, there will come a time when all this evil will be eliminated and what remains will be all good. Very easy to say, but can it be proved that evil is a lessening quantity? Take, for instance, the man who lives in a forest, who does not know how to cultivate the mind, cannot read a book, has not heard of such a thing as writing. If he is severely wounded, he is soon all right again; while we die if we get a scratch. Machines are making things cheap, making for progress and evolution, but millions are crushed, that one may become rich; while one becomes rich, thousands at the same time become poorer and poorer, and whole masses of human beings are made slaves. That way it is going on. The animal man lives in the senses. If he does not get enough to eat, he is miserable; or if something happens to his body, he is miserable. In the senses both his misery and his happiness begin and end. As soon as this man progresses, as soon as his horizon of happiness increases, his horizon of unhappiness increases proportionately. The man in the forest does not know what it is to be jealous, to be in the law courts, to pay taxes, to be blamed by society, to be ruled over day and night by the most tremendous tyranny that human diabolism ever invented, which pries into the secrets of every human heart. He does not know how man becomes a thousand times more diabolical than any other animal, with all his vain knowledge and with all his pride. Thus it is that, as we emerge out of the senses, we develop higher powers of enjoyment, and at the same time we have to develop higher powers of suffering too. The nerves become finer and capable off more suffering. In every society, we often find that the ignorant, common man, when abused, does not feel much, but he feels a good thrashing. But the gentleman cannot bear a single word of abuse; he has become so finely nerved. Misery has increased with his susceptibility to happiness. This does not go much to prove the evolutionist's case. As we increase our power to be happy, we also increase our power to suffer, and sometimes I am inclined to think that if we increase our power to become happy in arithmetical progression, we shall

increase, on the other hand, our power to become miserable in geometrical progression. We who are progressing know that the more we progress, the more avenues are opened to pain as well as to pleasure. And this is Maya.

Thus we find that Maya is not a theory for the explanation of the world; it is simply a statement of facts as they exist, that the very basis of our being is contradiction, that everywhere we have to move through this tremendous contradiction, that wherever there is good, there must also be evil, and wherever there is evil, there must be some good, wherever there is life, death must follow as its shadow, and everyone who smiles will have to weep, and vice versa. Nor can this state of things be remedied. We may verily imagine that there will be a place where there will be only good and no evil, where we shall only smile and never weep. This is impossible in the very nature of things; for the conditions will remain the same. Wherever there is the power of producing a smile in us, there lurks the power of producing tears. Wherever there is the power of producing happiness, there lurks somewhere the power of making us miserable.

Thus the Vedanta philosophy is neither optimistic nor pessimistic. It voices both these views and takes things as they are. It admits that this world is a mixture of good and evil, happiness and misery, and that to increase the one, one must of necessity increase the other. There will never be a perfectly good or bad world, because the very idea is a contradiction in terms. The great secret revealed by this analysis is that good and bad are not two cut-and-dried, separate existences. There is not one thing in this world of ours which you can label as good and good alone, and there is not one thing in the universe which you can label as bad and bad alone. The very same phenomenon which is appearing to be good now, may appear to be bad tomorrow. The same thing which is producing misery in one, may produce happiness in another. The fire that burns the child, may cook a good meal for a starving man. The same nerves that carry the sensations of misery carry also the sensations of happiness. The only way to stop evil, therefore, is to stop good also; there is no other way. To stop death, we shall have to stop life also. Life without death and happiness without misery are contradictions, and neither can be found alone, because each of them is but a different manifestation of the same thing. What I thought to be good yesterday, I do not think to be good now. When I look back upon my life and see what were my ideals at different times, I final this to be so. At one time my ideal was to drive a strong pair of horses; at another time I thought, if I could make a certain kind of sweetmeat, I should be perfectly happy; later I imagined that I should be entirely satisfied if I had a wife and children and plenty of money. Today I laugh at all these ideals as mere childish nonsense.

❑❑❑

All birds find shelter during the rain. But the eagle avoids rain by flying above the clouds. Problems are common, but attitude makes the difference!

- Dr. A.P.J. Abdul Kam

THE CHIDAKASHA GITA OF BHAGAWAN NITYANANDA OF GANESHPURI

(With Commentary by Acharya Kedarji)

10) We should leave off the gross sleep and sleep the subtle sleep. We should enjoy the sleep obtained from the practice of Pranayam.

Commentary : My Gurudev used to say that sleep is death. In the gross sleep, you experience the state of deep sleep where you are not aware of anything at all. The subtle sleep is one in which, while in the state of deep sleep, you are able to maintain the awareness that you are God and that your deep sleep is merely one of God's coverings. The way to enjoy this subtle sleep in which you are actually fully aware (and therefore fully awake) is by means of Pranayam. Pranayam is the practice of controlling and directing your breath so that it enters the Sushumna Nadi and moves about there, rising and falling, without the necessity to take any air in from the outside.

11) The upgoing breath is like the wheels inside a clock. Its movement is inside. When the movement of the breath is internal, one will see the world in himself.

Commentary: Prana Shakti is your breath. The upgoing breath is the Prana when it moves inside the Sushumna Nadi, rising through the Chakras. This is what causes Kundalini Shakti to rise after Kundalini has been fully awakened by a Liberated Sage. Just as the wheels inside a clock control the movement of a clock, the upgoing breath controls the creation, sustenance and withdrawal of the entire Universe. When a yogi, by the instruction and Grace of his/her Guru, is able to direct and maintain the Prana inside this Sushumna Nadi, without taking any breath in through the nose or mouth, such a yogi experiences all 36 Tattvas (stages of manifestation and withdrawal of the Universe) inside his own being.

12) Just as we see the sky reflected in the water in an earthen pot, so also, to the internal vision, the sky of consciousness becomes visible.

Commentary: The water inside a pot has the ability to reflect the sky above. But when doing so, the water, which is the reflecting surface, does not become the sky. It remains as water and the sky remains the sky. This is due to the reflective nature of the Supreme Subject (Parama Shiva) who becomes the internal soul of all sentient and insentient objects. One who knows this from the personal experience gained by Guru's Grace, is able to attain the internal vision by which Chidakasha, the great inner expanse of Divine Consciousness, becomes completely visible.

❑❑❑

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांची अमृतवाणी

आपल्या जीवनात परमेश्वरावाचून नडते असे जोपर्यंत आपल्याला वाटत नाही, तोपर्यंत आपले नामस्मरण खरे नव्हे. परमेश्वरच आपल्या जीवनाचा आधार आहे; त्या शिवाय आपण जगूच शकत नाही, अशी वृत्ती बाणल्यावर होणारे नामस्मरण तेच खरे नामस्मरण.

नाम घेत असतानाच स्वत:चा विसर पडणे म्हणजे 'नामसमाधी' होय. ही सर्वोत्कृष्ट समाधी होय ''परमार्थाचे मर्म काय असेल तर आसक्ती सोडून प्रपंच करणे. ज्याने आपल्याला प्रपंच दिला तो त्याचाच आहे असे समजून वागणे.''

आपल्या मुलाला जसे आपण प्रेमान घेतो तो परमार्थ आणि दुसऱ्याच्या मुलाला घेतो तो प्रपंच. स्तोत्र म्हणजे भगवंताची पत्राने भेट घेण्यासारखे आहे. तर नाम घेणे हे भगवंताला प्रत्यक्ष भेटण्यासारखे आहे. आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची कृपा नसून, असेल त्या परिस्थितीत आपले समाधान टिकणे, हीच त्याची खरी कृपा होय!

''सत्य वस्तूला ओळखणे हा परमार्थ, तर असत्य वस्तूला सत्य मानून चालणे हा प्रपंच होय. प्रपंचच झाला आणि प्रपंचातील अहंकार दूर झाला तरच तो परमार्थ होय! 'मी' कर्ता आहे, ही प्रपंचातील अहंकार दूर झाला तरच तो परमार्थ होय! 'मी' कर्ता आहे, ही प्रपंचातील पहिली पायरी. तर 'राम' कर्ता आहे, ही परमार्थातील पहिली पायरी होय!''

'अशी उत्तरे आपल्या मुखातून कशी येतात?' असा प्रश्न एका भक्ताने विचारला असता महाराज म्हणाले, ''तुमच्या मनात काय आहे हे तुम्हाला कळत नाही, इतके मला कळते. मी बोलतो कसा, माझे ज्ञान कुठुन येते, हे देहबुद्धीत रहाणाऱ्यांना कळणे कठीण आहे. एखादा प्रश्न मला विचारावा, असे ज्यावेळी तुमच्या मनात येते, त्याचवेळी तो प्रश्न मला समजलेला असतो. प्रत्यक्षात तुम्ही मला तो प्रश्न विचारता त्यावेळी तो प्रश्न मला समजलेला असतो. प्रत्यक्षात तुम्ही मला तो प्रश्न विचारता त्यावेळी, अर्थातच रामरायांच्या कृपेने माझ्याकडे त्या प्रश्नाचे उत्तर तयार असते. जग काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव प्रपंच, तर भगवंत काय म्हणेल म्हणून वागणे याचे नाव परमार्थ, फळाची अपेक्षा ठेवून कृती करणे याचे नाव कर्म, तर फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य. जो कधी चुकतो आणि कधी बरोबर येतो तो साधक व ज्याची दृष्टी रामरूप झाली तो गुरू. ज्याचे हेवपण जाास्त तो गरीब व ज्याचे हवेपण कमी तो श्रीमंत. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, तर विषयांची आवड म्हणजे प्रपंच.

महाराज सांगतात, ''आजच्या या दिवसापासून आपण आपल्या मुलाला जितक्या आपलेपणाने हाक मारतो, तितक्याच आपलेपणाने देवाला हांक मारायचे ठरवा आणि आतापर्यंत जितक्या आवडीने भगवंताचे नांव घेतले तितक्याच किंवा त्याहीपेक्षा जास्त आवडीने आणि निष्ठेने नांव घ्या! मला खात्री आहे, राम तुमचे कल्याण करील!

❑❑❑

Tera (13) Saath (7)

भक्ती में शक्ति है

- मंदार म्हात्रे

मी मंदार म्हात्रे, विलेपार्लेला असतो, पारस सिक्युरिटी सिस्टिम या नावाने CCTV कॅमेरे बसविणे वगैरेचा व्यवसाय करतो. माझे ऑफिस विलेपार्ल्यात हनुमान रोडवर भाडेतत्त्वावर २०,००० रू. महिना आहे त्याचा भाडे करार संपत आला होता. पाच वर्षात याच जागेवर व्यवसाय करत होतो तरी घरमालकाला भाडे वाढवून पाहिजे होते आणि त्यासाठी दबाव आणायला तो जागा खाली करायला सांगत होता. सगळे सामान घेऊन कुठे जाणार कळत नव्हते. या सर्व गोष्टींसाठी माझी मानसिक तसेच आर्थिक तयारी अजिबात नव्हती. कामा निमित्ताने माझी अजय नाडकर्णींशी ओळख झाली होती, मग घनिष्ठ मैत्रीही झाली. त्याच्याकडून नेहेमी परिज्ञान स्वामीजीं बद्दल ऐकायचो व नकळत त्यांची भक्तीही करायला लागलो होतो. नोव्हेंबर महिन्यात परीज्ञान छाया, कार्ला येथील कॅमेरे बसविण्याचे काम हातात घेतले आणि तेव्हाच अचानक घरमालकाचा फोन आला की आता तुम्हीच त्या जागेत रहा, आपण नवीन करार करू या आणि तुम्ही भाडेही पूर्वी द्यायचा तेवढेच द्या. माझा या गोष्टीवर विश्वासच नव्हता. माझ्या साठी तो एक चमत्कार होता. मी मनातल्या मनात स्वामीजींच्या स्मृतीला वंदन केले. माझ्याकडे तीन मुले कामाला आहेत. एका स्कुटरवर दोघांनाच जाता यायचे व दोघांसाठी रीक्षा करावी लागायची. वरील अनुभवानंतर काही दिवसांतच माझ्या मित्राचा फोन आला की त्याने नवीन बाईक घेतली आहे व आधीची उत्तम स्थितीतली बाईक आहे. ती तू घे. मला फक्त १५,००० रुपये दे, तेही महिना ५,००० दिले तरी चालेल. लगेचच बाईक ताब्यात गेतली. असे छोटे छोटे अनुभव येतच असतात. तेव्हां पासून मिळणाऱ्या कामांमधे सुद्धा चांगलीच वाढ झाली आहे. सगळी त्यांचीच कृपा. म्हणून मनापासून म्हणतो जय परिज्ञान!

❑❑❑

संतदर्शने महालाभ जाहला। ह्रदयगृही आनंदकंद पाहिला।।धृ।।

मी माझे म्हणुनि भ्रमे फिरत होतो भारी। दैवयोगे पातलो संतमहाद्वारी।।१।।

सापडुनि होतो गौडबंगाल जाली। सदय संतमायबापे मोकळीक केली।।२।।

बहुत जन्मार्जित भाग्य उदया आले। संतकृपे आजि माझे निजरुप समजले।।३।।

भ्रमर सुवासासि लुब्ध मक्षिका मधासि। तेचि चित्त गोवियेले आत्मह्रषीकेशी।।४।।

अणुरेणुपासुनि विश्वि कृष्ण संचला। भक्तकामकल्पतरु दास मनी राहिला।।५।।

कलावती आई

PARIJNAN CHAYA

Parijnan Parivar has opened a modest home for Senior Citizens, at Gurushakti Complex in Dahivali, Karla – 'PARIJNAN CHAYA'

We have 3 single bedded rooms, 2 double bedded rooms, 4 triple bedded rooms and 1 Dormitory with 5 beds. All the rooms are self contained.

It will be open for all those above 65 years of age with no caste bar.

We aim to make this place an abode of Tender Loving Care for all those who wish to be resident here.

We have tried to make it as comfortable as possible in the limited resources we have but the care and love will be limitless till the end.

We have common Dining and TV room, Prayer Hall, Sadhana and Yoga areas. The home is surrounded by lush green mountains, has a beautiful garden and other walking areas.

There are other Bhanap residents around the home and Karla Math is 1km away.

The Place will serve healthy Vegetarian, mostly 'Aamchi' food. There are full time and part time staff for helping out in cleaning and general hospitality.

There will be a Nurse visit daily, Doctor on call, Hospital with Ambulance pickup and specialty care facilities just 10 minutes away.

We have fixed charges for the facilities made available as above, as per the Room taken.

For details please Contact: Deepa Andar on 9820180104, Shashi Balsekar on 9833635359

Any expenses over and above what is specified above will have to be borne by the individual or his admitting guardian.

Those who cannot afford charges, will have to apply for subsidy on the prescribed form, and the decision will be solely dependent on the PP Committee.

Donations are welcome:

A/c Name: Parijnan Parivar
S/B A/C No. 108303130000325
IFSC: SVCB0000083
DADAR EAST BRANCH

Can Meditation Be Adapted to Modern Life?

Yes it can Meditation can be practised within the confines of our everyday life. We live a normal life in the world, but the difference is that we add time daily for meditation and try to become more ethical so as to accelerate our progress. We do our best at our jobs, attend to our family obligations, earn an honest livelihood, and try to help others. While doing all this we keep our eyes on the spiritual journey and the spiritual values of life.

- Sant Rajinder Singh Ji Maharaj

Benefits Of The OM Mantra

- ★ Chanting of OM Mantra purifies the environment around the Chanter and produces positive vibrations.
- ★ The OM not only gives positive results to the one who is chanting it but to the entire vicinity wherever its vibrations flow.
- ★ It cleanses your AURA.
- ★ It takes you to alpha, a meditational state which gives you deep relaxation.
- ★ Your concentration increases when you chant this universal hymn.
- ★ The ॐ chanting removes toxin from your body. It gives you better immunity and self-healing power.
- ★ It improves your concentration and helps you focus on your target.
- ★ The ॐ chanting improves your VOICE and gives a strength to vocal cord and muscles during old age.
- ★ The ॐ chanting produces a vibration and sound which is felt in your vocal cord and sinus. It opens pore which in turn helps in removal of sinus problems gradually and if done in complete faith.
- ★ Om Mantra has a cardiovascular benefit too which keeps blood pressure normal.
- ★ It helps in keeping your emotions controlled and thus by putting a control over emotions and leads you to excel in life.
- ★ It is just like any other supplement that will help in the overall development of your body and mind positively without any side effects.
- ★ It regular chanting helps in taking you to a spiritual journey and which will only result if it is done daily for a longer period of time.
- ★ When OM Mantra chanted in group produces immense positive vibrations which charge up the entire vicinity.
- ★ Even the attendants feel fully charged up even though a person is completely tired.
- ★ Some people also claims to lose weight through ॐ chanting As it puts your entire body in work and its vibrations affects you positively hence enhancing your metabolism which leads to weight loss.
- ★ Om cleanses your skin and gives a sunny glow on your face when you chant OM regularly.
- ★ When you tend to chant it regularly you start feeling stronger.
- ★ Spinal cord efficiency is also increased by vibrations caused by sound of Aaaa. As this sound is generated from abdomen and mainly supported by spinal cord.
- ★ The sound uuu is created by vocal cord which affects thyroid glands and throat.
- ★ The sound uuu is created by vocal cord which affects thyroid glands and throat.
- ★ Even a picture of OM purifies the environment around.
- ★ It is said that rubbing hands while ॐ chanting and putting those charged hands on different parts of body heals or activates those body parts.
- ★ If those rubbed hands are put on your eyes your eye sight will start improving.
- ★ And if rubbed on your face, it can give you a great personality.
- ★ It is proved that chanting this Mantra improvises quality of water. So before drinking if OM is chanted it puts water crystal in most beautiful sequence, which effects the body beautifully.

- Source Internet

महाशिवरात्र

शिवरात्री वर्षभरातील प्रत्येक महिन्यात येत असते, परंतु, माघ महिन्यातील महाशिवरात्री ही महत्त्वाची मानली जाते. माघ कृष्ण चतुर्दशी ही तिथी महाशिवरात्र म्हणून पाळली जाते. या दिवशी शैव पंथीय उपवासाचे व्रत करतात. भगवान शिवाची आराधना आणि प्रार्थना करून दुसऱ्या दिवशी व्रताची सांगता केली जाते. उत्तर भारतात हाच दिवस फाल्गुन महिन्यात गणला जातो, तर इंग्रजी महिन्याप्रमाणे हा दिवस बहुधा फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येतो.

महाशिवरात्र' हे कल्याणकारी शिवाचे आराधना पर्व असल्याने महाशिवरात्रीला मोठे महत्त्व आहे. पृथ्वीची निर्मिती झाली तेव्हा याच तिथीला मध्यरात्री भगवान शिवशंकराने रौद्ररूप धारण केले होते. यामुळे या रात्रीला महाशिवरात्र अथवा कालरात्र असेही म्हटले जाते.

ज्योतिषशास्त्रानुसार सूर्य याच महिन्यात उत्तरायणाचा प्रवास प्रारंभ करतो. या महिन्यात होणारे ऋतूचे परिवर्तनही शुभ मानले जाते. म्हणून या महिन्यात येणारी महाशिवरात्र भोलेनाथाची आवडती तिथी आहे. शिवशंकराने हिरणांना मृग नक्षत्र म्हणून अन पारध्याला व्याघ्र नक्षत्र म्हणून आकाशात कायमचे स्थान दिले. हे घडले तो दिवस होता महाशिवरात्रीचा.

महाशिवरात्री व्रताला सकाळीच प्रारंभ होत असतो. या दिवशी सुवासिनी शिवमंदिरात जाऊन मातीच्या भांड्यात पाणी, दूध भरून त्यावर बेल, धोतऱ्याचे पुष्प व भात टाकून शिवलिंगावर अर्पण करतात. काही महिला घरातल्या घरात ओल्या मातीचे शिवलिंग तयार करून त्याचे पूजन करतात.

महाशिवरात्रीला जागरणाचे खूप महत्त्व आहे. हे व्रत नैमित्तिक व काम्य म्हणजे इच्छा पूर्ण करणारे आहे असे मानले जाते. शिवरात्रीच्या रात्री चार प्रहर पूजा करावी असे संकेत आहे त्यांना 'यमपूजा' असे म्हणतात.

या दिनी भोलेनाथ व पार्वती यांचा विवाह झाला होता. यामुळे महिला रात्री जागरण करून भोलेनाथाची वरात काढतात. हे व्रत दीड दिवसाचे असते. त्यामुळे त्याची दुसऱ्या दिवशी सकाळी समाप्ती होते. दुसऱ्या दिवशी महिला ब्राह्मण भोजन घालत पतीचा आशीर्वाद घेऊन महाशिवरीच्या व्रताचा समरोप करतात.

महाशिवरात्रीचे व्रत कुमारिका देखील करतात. शिवरात्रीचे व्रत केल्याने कुमारीकांच्या विवाहातील अडचणी दूर होतात असे मानले जाते. शिवशंकराच्या कृपेने मनाप्रमाणे वर प्राप्त होतो अशी श्रद्धा आहे.

भारतात अनेक शिवमंदिरे असून शिवरात्रीला ठिकठिकाणी अशा मंदिरात यात्रा भरतात.

अन्य कोणतेही उपास न पाळणारे हिंदू पुरुष अश्विनी आणि कार्तिकी या दोन एकादशाना आणि महाशिवरात्रीला उपवास करतात.

★महाशिवरात्री' म्हणजे काय ?★

पृथ्वीवरील एक वर्ष म्हणजे स्वर्गलोकातील एक दिवस. शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. शिवाच्या विश्रांती घेण्याच्या काळाला 'महाशिवरात्री' असे म्हणतात.

★महाशिवरात्रीचे व्रत का करावे ?★

शिवाच्या विश्रांतीच्या काळात शिवतत्त्वाचे कार्य थांबते, म्हणजेच त्या काळात शिव ध्यानावस्थेतून समाधि-अवस्थेत जातो. शिवाची समाधि-अवस्था म्हणजे शिवाने स्वतःसाठी साधना करण्याचा काळ. त्या काळात विश्वातील तमोगुण शिवतत्त्व स्वीकारत नाही. त्यामुळे विश्वामध्ये तमोगुणाचे प्रमाण किंवा वाईट शक्तींचा दाब प्रचंड वाढतो. त्याचा परिणाम आपल्यावर होऊ नये म्हणून शिवतत्त्व आकृष्ट करून घेण्यासाठी महाशिवरात्रीचे व्रत करावे.

★व्रत आचरण्याची पद्धत व विधी★

उपवास, पूजा व जागरण ही या व्रताची तीन अंगे आहेत. शिवरात्रीच्या दिवशी एकभुक्त रहावे. शिवरात्रीला रात्रीच्या चार प्रहरी चार पूजा कराव्या, असे विधान आहे. त्यांना 'यामपूजा' असे म्हणतात. प्रत्येक यामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालून अनुलेपन करावे. शिवतत्त्व आकृष्ट करणारा बेल, पांढरी फुले व रुद्राक्षांच्या माळा शाळुंका व शिवपिंडीवर वाहाव्यात. धोत्रा व आंबा यांची पत्रीही या पूजेत वाहातात. तांदुळाच्या पिठाचे २६ दिवे करून त्यांनी शिवाला ओवाळावे. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान द्यावेत. प्रत्येक पूजेचे मंत्र वेगवेगळे असतात, त्यांनी अर्घ्य द्यावे. शिवस्मरणात जागरण करावे. पहाटे स्नान करून पुन्हा पूजा करावी. पारण्याला ब्राह्मणभोजन घालावे. ब्राह्मणांचा आशीर्वाद घेऊन व्रत समाप्ती करावी.

★शिवपूजेची वैशिष्ट्ये★

१) शिवपिंडीला थंड पाणी, दूध किंवा पंचामृत यांनी स्नान घालतात.
२) शिवाच्या पूजेत हळद-कुंकू वापर नाहीत; मात्र भस्म वापरतात.
३) शिवपूजेत पांढऱ्या अक्षता वापरतात.
४) शिवलिंगाला तांदूळ, क्वचित गहू व पांढरी फुले वाहातात.
५) शिवपिंडीला पूर्ण प्रदक्षिणा न घालता अर्धचंद्राकृती प्रदक्षिणा घालतात.

★महाशिवत्रीला शिवाचा नामजपचे महत्त्व★

महाशिवरात्रीला विश्वात वाढणाऱ्या तमोगुणापासून रक्षण होण्याकरता शिवतत्त्व आकृष्ट करण्यासाठी शिवाचा ।।नमःशिवाय।। या शिवाचा पंचाक्षरी मंत्राचा जास्तीतजास्त करावा.

माघ महिना उगवला, शिवरात्र येऊ लागली की घरातली मोठी माणसं शिवलिलामृत, काशीखंड ह्या सारख्या ग्रंथांच वाचन सुरू करतात. कुणी 'ॐ नमः शिवाय' ह्या पंचाक्षरी मंत्राचा जप सुरू करतात, तर कुणी हौशी मंडळी ह्या महाशिवरात्रीची पर्वणी साधून बारा ज्योतीर्लिंगे किंवा पुरातन शिव मंदिरांना आवजूर्न दर्शन भेट देतात.

ह्या पवित्र दिवशी शिवशंकराला रुद्राभिषेक करणे, जप करणे, बेल पत्र वाहणे, उपास करणे इ. गोष्टी आवर्जून केल्या जातात. शिव म्हणजे कल्याण, शिव म्हणजे ज्ञान, महाशिवरात्रीच्या उपासनेमुळे उपासकाचे निश्चितच कल्याण होते. त्याला ज्ञान प्राप्त होते. त्याला उत्कर्षाचा, मुक्तीचा विकासाचा मार्ग सापडतो.

★महाशिवरात्रीची कथा.★

शिव उपासनेमुळे माणसाच्या दृष्ट प्रवृती कशा बदलतात, सदाचार, विवेक खऱ्या अर्थाने कसा जागा होतो, ह्या बद्दल 'शिवलिलामृत' मध्ये एक कथा आहे ती अशी की :

असाच एक महाशिवरात्रीचा दिवस. एक पारधी शिकार करायची म्हणून जंगलात गेला. जलाशयाच्या एका वृक्षावर जाऊन बसला. पाणी पिण्यासाठी म्हणून एखादं सावज आलं, एखादा प्राणी आला की त्याची शिकार करायची हा हेतू. दुपारपासून धनुष्य बाण सज्ज करून तो बसला खरा!... पण... दिवस गेला-संध्याकाळ झाली, सूर्य अस्ताला गेला, तिन्ही सांजा होऊ लागल्या तरी एकही प्राणी त्या जलाशयाकडे आला ही नाही अन् शिकार मिळाली नाही.

तेवढ्यात काही हरणं पाणी पिण्यासाठी म्हणून तिथं आली. पारध्याने धनुष्याची दोरी मागे खेचली. तो आता बाण सोडणार तोच त्या हरिणांचा प्रमुख पुढे आला आणि पारध्याला म्हणाला, हे पारध्या! तू तर शिकारी आहेस. शिकार करणे हा तुझा धर्म आहे. तू आम्हाला मारणार हे ही खरं आहे. पण त्या आधी आमची एक विनंती ऐक. आम्ही एकदाच आमचं कर्तव्य पूर्ण करून येतो. आमच्या कुटुंबियांना भेटून येतो मग तू आम्हाला मार. खरं तर हातातोंडाशी आलेली शिकार जाऊ कशी द्यायची. पण त्या हरिणाच्या प्रमुखाने परत येण्याच वचन दिलं. तेव्हा पारधी म्हणाला ''ठीक आहे उद्या सकाळच्या सूर्योदयापूर्वी मात्र तुम्ही आलं पाहिजे.''

हरिणाच्या कळपांनी ते मान्य केलं आणि ती निघून गेली. आता रात्र कशी काढायची. तोच दूरवरच्या मंदिरातून घंटानात ऐकू आला. पाठोपाठ ॐ नमः शिवाय म्हटले. नकळत नाममंत्राची पारध्याला गोडी लागली. सहज चाळा म्हणून तो ज्या वृक्षावर बसला होता, त्याची पानं तोडून तो खाली टाकू लागला. तो नेमका बेलाचा वृक्ष होता. ती बेलाची पाने पारध्याच्या हातून नेमकी वृक्षाखालच्या शिवपिंडीवर पडत होती. नकळत त्याच्या हातून ती शिवपूजा घडत होती.

तोच ते हरिण आले आणि म्हणाले, ''पारध्या सोड बाण, मी माझं कुटुंब प्रमुखाचं कर्तव्य पूर्ण करून आलोय. मला आता मार...'' इतक्यात एक हरिणी पुढे येऊन म्हणाली. ''त्याला नको मला मार, तो माझा पती आहे. त्याच्या आधी मला मार. मला माझा पत्नी धर्म पाळू दे.'' तेवढ्यात ती पाडसं पुढे आली आणि म्हणाली त्या दोघांआधी आम्हाला मार. ते आमचे आई वडील आहेत. आम्हाला आमचा पुत्र धर्म पाळू दे. त्यांच रक्षण करू दे.

एका पाठोपाठ एक अशी प्रत्येकाचीच दुसऱ्याला वाचवायची व कर्तव्यदक्षतेची चढाओढ पाहिली अन पारध्याने विचार केला, हे प्राणी आपला धर्म कर्तव्य पाळतात तर मी का दयेचा धर्म पाळू नये. त्याची शिकार करून पापाचा धनी का होऊ. पारध्यानं सर्वानाच जीवनदान दिले.

भगवान शंकर प्रसन्न झाले. त्यांनी सर्वांचाच उद्धार केला. हरिणांना मृग नक्षत्र म्हणून अन् पारध्याला व्याघ्र नक्षत्र म्हणून आकाशात कायमचे स्थान दिले. हे घडले तो दिवस होता महाशिवरात्रीचा.

❑❑❑

An aimless life is always a trouled life. Every individual should have an aim. But do not forget that the quality of your aim will depend the quality of your life. Your aim should be high and wide, generous and disinterested, this will make your life precious to yourself and to others. Whatever your ideal, it cannot be perfectly realized unless you have realized perfection in yourself.

- Sri Aurobindo

संत कबीरजींचे दोहे व त्यांचा इंग्रजी अनुवाद 3

ऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोये।
औरन को शीतल करे, आपहुं शीतल होय।।

One should speak in such a sweet language which makes not only oneself happy but others also who listen to you.

बोली एक अनमोल है, जो कोई बोले जहान।
लियै तराजू तौली के, तब मुख बाहर अहान।।

Speech is like a priceless jewel. So when someone speaks, one must think many times and then speak.

आग जो लगी समंद में, धुंआ ना परगत होए।
सो जानेजो जरमुआ, जाकी लागी होए।।

The ocean is on fire, but the smoke is not visible. Only the one who is burnt knows about the fire.

आसा जीवेजग मरे, लोग मरेमर जाई।
सोई सब संचते, सो उबरे जे खाई।।

Hope lives in a dying world. People die and die again. People perish even after hoarding wealth and attachments. We should try to attain freedom from this.

अकथ कहानी प्रेम की, कुछ कही न जाए।
गूंगे केरी शर्करा, बैठे मुसकाए।।

The feeling of love can not be expressed in words, just like a dumb person eating sweets, can not explain the sweetness of it, can only smile.

बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय।
जो मन खोजा अपना, तो मुझसे बुरा ना कोय।।

When I searched for evil in this world, I couldn't find anything bad. When I looked within I found nothing worst than me.

चलती चक्की देखकर, दिया कबीरा रोये।
दो पाटन के बीच में, साबुत बचा न कोए।।

Looking at the grinding stones Kabir laments in the duel of wheels of life no one or nothing stays intact.

चिंता ऐसी डाकिनी, काट कलेजा खाए।
बैद बिचारा क्या करे, कहां तक दवा लगाए।।

Worry is so damaging, it eats one's heart. Even the best doctor can not cure it or have remedy on this melady.

❑❑❑